दैनिक सत्यप्रभा

# तरुणांनी शेती विकासाचा झेंडा हाती घ्यावा -बऱ्हाटे

**भोकर,दि.६–** तरुणांनी राजकीय पक्षाचे झेंडे हाती घेऊन जीवनातील अमूल्य वेळ वाया घालवण्यापेक्षा शेती विकासाचे झेंडे हाती घेऊन शेतीच्या बांधावर , माळराणावर वृक्ष लागवड व संवर्धन करण्यासाठी प्रयत्न करावेत हीच खरी समाजसेवा देशसेवा ठरेल असे प्रतिपादन जिल्हा कृषी अधीक्षक भाऊसाहेब बऱ्हाटे यांनी केले .

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून भोसी येथे सृष्टी रोपवाटीकेच्या वतीने पाचहजार वृक्षलागवडींचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे माजी सभापती प्रकाश देशमुख भोसीकर यांची तर प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय कृषी आधिकारी राजकुमार रणवीर , कृषी विज्ञान केंद्र नांदेडचे कृषी विद्यावेता, डॉ. संदीप जायभाये,तहसीलदार सुरेश घोळवे,तालुका कृषी अधिकारी दिलीप जाधव , उमरीचे तालुका कृषी अधिकारी मिरासे आदींची उपस्थिती होती.यावेळी जिल्हा परिषदेचे अप्पर मुख्य कार्यकारी अधिकारी माळवदे यांच्या हस्ते नारळाचे झाड लावून पर्यावरण दिवसाचा जागर करण्यात आला. या कार्यक्रमास किनवट, माहूर, भोकर,नांदेड तालुक्यांतील पंचायत समिती, महसूल व कृषी विभागातील अधिकारी,कर्मचारी तसेच परिसरातील पर्यावरण प्रेमी नागरीक व शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नागराज कांबळे यांनी केले तर आभार नंदकुमार गायकवाड यांनी मानले.